प्रेस प्रकाशनी PRESS RELEASE

भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA

**संचार विभाग,** केंद्रीय कार्यालय, एस.बी.एस.मार्ग, मुंबई-400001
DEPARTMENT OF COMMUNICATION, Central Office, S.B.S.Marg, Mumbai-400001
फोन/Phone: 91 22 2266 0502 फैक्स/Fax: 91 22 22660358

वेबसाइट : www.rbi.org.in/hindi
Website : www.rbi.org.in
इ-मेल email: helpdoc@rbi.org.in

जुलै 31, 2017

**भारतीय रिझर्व बँकेकडून युनियन बँक ऑफ इंडियावर दंड लागु**

जुलै 26, 2017 रोजी भारतीय रिझर्व बँकेने, युनियन बँक ऑफ इंडिया ह्यांना, तुमचा ग्राहक जाणा (केवायसी) निकषांबाबत रिझर्व बँकेने दिलेल्या सूचनांचे पालन न केल्याबाबत रु.20 दशलक्ष दंड लावला आहे. आरबीआयने दिलेल्या काही सूचनांचे, वरील बँकेने पालन न केल्यामुळे, बँकिंग विनियामक अधिनियम 1949 च्या कलम 46 (4) (1) सह वाचित, कलम 47 अ(1)(क) ने तिला दिलेल्या अधिकारांचा वापर करुन आरबीआयने लावला आहे.

ही कारवाई, विनियामक पालनामधील त्रुटींवर आधारित असून, वरील बँकेने तिच्या ग्राहकांबरोबर केलेल्या एखाद्या व्यवहाराच्या वैधतेबाबत किंवा कराराबाबत वरील कारवाई करण्यात आलेली नाही.

पार्श्वभूमी

वरील बँकेतील एका फसवणुकीच्या/अफरातफरीच्या संबंधाने माध्यमांमध्ये दिलेल्या रिपोर्टवर आधारित, युनियन बँक ऑफ इंडियामधील, लक्षणीय व्यवहार केले गेलेल्या काही खात्यांची तपासणी करण्यात आली. ह्याबाबत मिळालेल्या काही कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर, आरबीआयने वरील बँकेला नोटिस पाठवून, आरबीआयने दिलेल्या सूचनांचे पालन न केल्याबद्दल वरील बँकेवर दंड का लावण्यात येऊ नये ह्याचे कारण मागितले होते.

ह्यावर वरील बँकेने दिलेले उत्तर आणि व्यक्तिगत सुनावणीमध्ये दिलेली सादरीकरणे, तसेच देण्यात आलेली अतिरिक्त कागदपत्रे व माहिती विचारात घेऊन, रिझर्व बँकेने निष्कर्ष काढला की रिझर्व बँकेच्या सूचनांचे पालन न केल्याबाबत केलेला वरील आरोप योग्य ठरत असून त्यासाठी दंड लावणे आवश्यक आहे.

**अजित प्रसाद**

**वृत्तपत्र निवेदन : 2017-2018/294** सहाय्यक सल्लागार